१८२९.
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ८११
REFBK-0003833

म. सं. ठाणें
निबंध
८११.

ॐ

८-२-३२

जयपुर येथील आदर्शरूप

# ब्राह्मणसभा

किंवा

आपत्कालींही ब्राह्मणांनीं कसें वागावें.

REFBK-0003833

लेखक

## प. केशवानंद स्वामी

प्रकाशक

अ. न. महाजन.

रावपुरा महाजनाची पोळ.

बडोदें

कि. ०-२-०

# प्रस्तावना.

मनुष्य मात्राचा सुखासाठीं नित्य प्रयत्न सुरु आहे पण कधींही त्याचे सुखाची घडी नीट बसत नाहीं. कारण सुखें दोन प्रकारचीं आहेत. एक शाश्वत सुख व दुसरें थोडा काळ-पर्यंत टिकणारें विषयजन्य--प्रापंचिक सुख. शाश्वत सुख चित्त-शुद्धि झाल्यावर ईश्वर भजनानें गुणातीत मनुष्यास प्राप्त होतें व दुसरे प्रकारचें सुख-बलवान, उद्योगप्रिय, व्यवस्थित व धूर्त मनुष्याला प्राप्त होत असतें. आतां शाश्वत सुख तर राहोंच पण या भारत देशांतील बहुतेक लोकांना हें प्रापंचिक सुखही मिळेनासें झालें आहे. कारण आज शेंकडों वर्षांपासून येथील लोक ईश्वरश्रद्धा, आश्रमानुरूप कर्तव्यकर्म, सत्य, शरीरबल, उद्योगप्रियता, कलाकौशल्य व शिस्त ह्यांकडे दुर्लक्ष्य करून त्या विरुद्ध असलेल्या गुणांचे साम्राज्यांमध्यें बेगडी परमार्थांचे पोशाकांत वावरत जात असल्यामुळें त्यांस विपन्नावस्था प्राप्त झाली आहे. बेगडी परमार्थांत परमार्थ तर साधत नाहींच

पण प्रपंचही सुखावह होत नाहीं. कारण परमार्थ वाटतो तितका सोपा नाहीं.

। परमार्थ नव्हें सोपा । ज्ञानगोष्टी व्यर्थचि बापा ।
। जरी होय इश्वर कृपा । तरीच हा प्रपंच सुटे ॥
। जयास वाटे वैराग्य करावें । तेणें कांहींच न विचारावें ।
। उठोनि वाटेचि लागावे । दिगंता प्रती ॥ जुना दासबोध

म्हणूनच श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं लोकांना प्रपंचही नीट करतां येत नाहीं असें पाहिलें तेव्हां " आधीं प्रपंच करावा नेटका " म्हणजे अनासक्तीचा ईश्वराधिष्ठानासह दीर्घ सुचनेचा प्रपंच करावयास सांगितलें. मग तो अव्यवस्थित कां करावा ?

ह्या तत्वाला अनुसरून एक काल्पित विजयपुरी येथील ब्राम्हण सभा कल्पून तिनें ब्राम्हण समाजाची कशी सुधारणा केली त्याबद्दल ह्या " विजयपुरी येथील आदर्शरूप ब्राम्हण-सभा " पुस्तकांत थोडक्यांत दोन शब्द लिहिले आहेत. त्याप्रमाणें ब्राम्हणांनीं आपली सुधारणा करून घ्यावी हा ह्या पुस्तकाचा हेतु आहे. प्रथम सर्व ब्राम्हणांनीं आश्रम धर्मानुरूप

संगी-३२८



वागून सर्व बाजूंनीं आपली सुधारणा करून घ्यावी. आणि हेंही ध्यानांत असूं द्यावें कीं, उत्तम आचरण न ठेवतां केवळ त्रिपुंड लावून लांबलचक संध्या-पूजा केल्यानें आणि तसेंच सामान्य आचरण बरें ठेवून आश्रम-धर्माचें गवाळें खुंटीस टांगुन ठेवल्यानेंही कांहीं, भागणार नांहीं. तरी ब्राह्मणांनीं उभय बाजूंनीं निर्दोष राहून त्रैवर्णिकांना उपदेश करण्याचा त्यांना अधिकार असल्यानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्यांनीं राष्ट्र-कार्य करावें.

लेखक गुजराथेंतील महाराष्ट्रीय असल्यानें भाषेंत दोष असण्याचा संभव आहे, त्याकडे वाचक दुर्लक्ष्य करतील.

मिति ज्येष्ठ शु ० ५
बुधवार शके १८५१
बडोदें.

प० केशवानंद.

७८
२९

# वाचकांस सूचना.

प० स्वामींनीं लिहिलेलें हें पुस्तक एक वर्षानंतर छापण्यास घेतलें आहे. सदरहु पुस्तकाची छपाई अत्यंत शुद्ध असावयास पाहिजे होती. पण प्रयत्न करूनही कांहीं अनिवार्य कारणामुळें तसा योग आला नाहीं. तरी वाचक पुस्तक वाचतांना त्याकडे दुर्लक्ष्य करतील अशी आशा आहे.

मिति मार्गशीर्ष व. १
शके १८५२ बडोदें

प्रकाशक.
अ. न. महाजन.

---

ल. रा. गोळवलकरकृत.

श्रीगजाननपद्यरत्नमाला मागविकास फुकट.

श्रीगीतकुसुममाला .... ... ०-२-०

प. केशवानंद स्वामी कृत.

विजयपुरी येथील आदर्शरूप ब्राम्हणसभा ०-२-०

सदरहु पुस्तकें प्रकाशकाकडे मिळतील. ट. ख. निराळा.

प्रकाशक.
अ. न. महाजन.

८-२-३२

# अनुक्रमणिका.

पृष्ठ

( १ ) ब्राम्हणांची सद्यस्थिति .... .... १

( २ ) ब्राम्हण सभेचें ध्येय .... .... ३

( ३ ) सभेची घटना .... .... ५

( ४ ) प्रथम काय केलें .... .... ६

( ५ ) आठ वर्षांनंतर ब्राम्हणसमाजाची स्थिति १३–५१

( नं. २ च्या ध्येयापासून नं. १४ व्या ध्येयापर्यंत कशी सुधारणा झाली तें अनुक्रमानें पहावें. )

( ६ ) तात्पर्य ... .... .... ५२

१८००.

ॐ

२१.११.३८

# विजयपुरी येथील आदर्शरूप ब्राम्हणसभा.

दा. क्र. ३६३

॥ नमो ब्रह्मण्य देवाय गोब्राह्मणहिताय च ॥
॥ जगद्धिताय कृष्णाय गोविंदाय नमोनमः ॥

हिंदुस्थानांतल्या एका देशी राज्यांत विजयपुरी ह्मणून एक नगर आहे. तेथें आपल्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांचीं जवळ जवळ दोन अडीच हजार घरें असून ब्राह्मण–संख्या सुमारें ८-१० हजार पर्यंत आहे. तेथील कांहीं विवेकी ब्राह्मणांनीं असा विचार केला कीं, दिवसें दिवस आपल्या ब्राह्मण जातीची अवनती होत चालली आहे. एक वेळीं जे आह्मी सर्व जातींना वंद्य होतो, व सर्व विद्या व कलांचे अध्यापक–गुरु होतों, ते आंह्मीं ब्राह्मण आज सर्व जातींकडून लाथाडलें जात असून उदरभरणासाठीं केवळ नोकरीच्या मागें लागलों आहोंत. पोष्टांत, रेल्वे खात्यांत, मुलकींत, न्यायखात्यांत, पोलिसांत, कॉलेजांत ब्राह्मण हुशार असला, हक्कदार असला तरी सुद्धां ब्राह्मणास फांटा देऊन अन्य जातीयास नोकरी मिळते. इकडे आमचे देशबांधवांपैकीं कित्येक तर आमच्या हात

घुवून पाठीस लागले आहेत. दरेक गोष्टींत त्यांचेपासून ब्राह्मणांस त्रास होत आहे, फारतर काय ब्राह्मणांच्या जमिनी असूनही कोणीहि नांगरण्यास न मिळाल्यामुळें त्या ओस पडल्या आहेत. ब्राह्मणांचा मुख्य धंदा यजन-याजन, अध्ययन-अध्यापन ते तर आह्मी पिढयानुपिढया पासून सोडून दिला आहे. कोणाशीं कोणाला मेळ नाहीं, वाटेल त्यानें वाटेल तें करावें. धर्मबंधन नाहीं, विद्या नाहीं, कला—कौशल्य नाहीं, शिस्त नाहीं, जातीचा अभिमान नाहीं, देशाचा अभिमान नाहीं, धारिष्ठ नाहीं, शरीराला जरा सुद्धां दुःख द्यावयाचें नाहीं, ऐक्य तर मुळींच नाहीं, बोलण्याचा कृतिशीं मेळ नाहीं आणि आळस तर आह्मांला मुळींच सोडवत नाहीं इतकें असुनही आह्मांस अजून पारतंत्र्याची आंच मुळींच जाणवत नाहीं! नुसतीं व्याख्यानें ऐकावयाचीं, पण करावयाचें कांहीं नाहीं; वर्तमानपत्रें मासिकें वाचावयाचीं पण करावयाचें कांहीं नाहीं, वरवर चळवळी, सभा करावयाच्या, हियर—हियर ह्मणून टाळ्या वाजवावयाच्या, पण खरोखर असें कांहींच करावयाचें नाहीं. अशा प्रकारची उत्पन्न झालेली परिस्थिति आतां बदलल्या शिवाय गत्यंतर नाहीं, असें जाणून त्यांनीं सर्व ब्राह्मणांची एक

सामान्य सभा बोलाविली. सभास्थान, मध्यवर्ती एक विशाल मंदीर असल्यानें ब्राह्मणसमूह बराच जमला होता, वर वर्णन केलेली ब्राह्मणांची परिस्थिति आज अशी आहे हें सर्वांस समजावतां तें बहुतेकांस पटलें; ही परिस्थिति बदलली पाहिजे हेंही त्यांस पटलें; पण आतां ही सुधारणा करावयाची कशी? हा एक त्यांस मोठा विचार पडला. पण प्रयत्न केल्या शिवाय कार्य होणार नाहीं, असें जाणून प्रथम ब्राह्मण सभेचें ध्येय काय तें खालीं दर्शविल्या प्रमाणें ठरविण्यांत आलें.

[ १ ] ब्राह्मणानें नास्तिक न बनतां आपल्या धर्मानें वागणें.

[ २ ] पहिल्या नंबरची स्वच्छता व शिस्त पाळून बोलण्या-चालण्यांत मेळ असणें,

[ ३ ] कोणाशींही द्वेष न करितां ऐक्य वाढेल तो प्रयत्न करणें.

[ ४ ] सर्व ब्राह्मण-समाज सद्गुणी व शीलवान बनेलतोप्र यत्न करणें.

[ ५ ] दुर्व्यसनें व आळस सोडून उद्योग-प्रिय होणें.

[६] जें समजलें व पटलें ती सुधारणा करण्यास दुसऱ्या क्षणापासून आरंभ करणें.

[७] ब्राह्मणाच्या उद्योग-धंद्या विषयीं विचार करून त्यांत सरळता करून देणें.

[८] संस्थेच्या कार्यासाठीं द्रव्य सहाय्य मिळविणें.

[९] ब्राह्मणजातींसाठीं एक वाचनालय व पुस्तकालय उघडणें, व शिक्षण संस्था उघडणें.

[१०] धंदेशिक्षण देणारी संस्था उघडणें, व देशी वस्तूंचा प्रसार करणें.

[११] शारिरिक ( व्यायाम–कसरत ) शिक्षणाची संस्था उघडणें व स्वच्छता आणि आरोग्यतेचीं तत्वें समजावणें.

[१२] गरीब ब्राह्मण–विद्यार्थ्यांस मदत करणें व संकट समयीं गरीबांस सहाय्य करणें.

[१३] कीर्तनें, व्याख्यानें; प्रवचनें ह्या साधनांनीं समाज सुशिक्षित करून सुधारणा करणें, व विद्वानांची संभावना करणें.

[ १४ ] गुरुकुल–सारखी लहानशी संस्था काढणें.

सदरहु ध्येयें ठरवितांना कित्येकांनीं प्रथमच्या ६ कलमां विषयीं अशक्यता प्रदर्शित केली, पण ही सुधारणा करायची नाहीं हें ह्मणणें ह्मणजे जळत्या घरांतच वस्ती करून रहाण्याचा आग्रह धरून बसण्या सारखें आहे; सभेंत वाटाघाट होतां बहुमतांनीं वरील ध्येयें मंजूर ठेवलीं गेलीं.

नंतर एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, दोन चिटनीस, एक खजीनदार, दोन हिशेब तपासनीस, अठरा सभ्य असें पंचवीस जणांचें नियुक्त मंडळ ठरविण्यांत आलें. तसेंच एकंदर ब्राह्मण वस्तीतून २५ स्वयंसेवक घेण्याचे ठरविलें.

वर्गणी व देणगी संबंधानें खालील प्रमाणें धोरण ठरलें.

| | | | |
|---|---|---|---|
| आश्रयदाते रु. १०० किंवा अधिक | | वर्ग २ रा | ०–४–० |
| तहाहयात सभासद रु. ५० | | वर्ग ३ रा | ०–२–० |
| हितचिंतक | रु. २५ | वर्ग ४ था | ०–१–० |
| मासिक वर्गणीदार वर्ग १ ला ०-८-० | | | |

शके १८XX च्या गुडीपाडव्याचे मुहूर्तावर सदरहु ब्राह्मणसभा स्थापन झाली. व लागलीच हनुमंतजयंतीस कार्य-

कारी मंडळीची सभा बोलावून त्याच दिवशीं २५ स्वयंसेवक नक्की केले.

प्रथम विजयपुरीचा एक मोठा नकाशा पैदा केला. त्याचे ब्राह्मणवस्तीच्या मानानें २४ विभाग पाडले. त्या प्रत्येक विभागांतून एक स्वयंसेवक नक्की करुन त्यावर एक मुख्य नायक नेमला गेला. विजयपुरीतील एका मल्लविद्याविशारदानें चालविलेल्या तालिमखान्यांत सदर २५ स्वयंसेवकांनीं जाऊन तीन महिन्याचें आंत कवाइतीचें, शिस्तीचें व इतर तदनुषंगिक शिक्षण घेऊंन अध्यापकाचा दाखला घेऊन यावें, कार्यकारी मंडळाकडून जें ठरविण्यांत येईल त्या कार्यास स्वयंसेवकांनीं मदत करावी असें ठरलें गेलें.

कार्यकारी मंडळीची दर अठवडयास सभा भरत असे, सभेसाठीं एका सद्गृहस्थानें आपली जागा दिली होती. सामान्य सभा भरविण्यास अडचण पडूं नये ह्मणून एका विशाल राममंदिराची जागा नक्कीं करण्यांत आली. शिस्तीचें व कवायतीचें वगैरे शिक्षण घेऊन स्वयंसेवक तयार होण्यास चार महिने लागले.

दरेक सभेच्या वेळीं स्वयंसेवक हाजर रहात असत. सभासदांस आमंत्रणें, बैठक घालणें, दिवाबत्ती व इतर बंदोबस्ताचीं कामें सर्व स्वयंसेवकच करीत असत, त्यामुळें अध्यक्ष उपाध्यक्ष, व सेक्रेटरी ह्यांसच जागा झाडून बैठक घालण्याचा प्रसंग येत नसे.

ब्राह्मणांचें वस्तीपत्रक झाल्याशिवाय पुढील कार्यास अडचण वाटूं लागली, ह्मणून प्रथम तेंच काम मंडळींनीं हातीं घेतलें. आपल्या जातीची परिस्थिति नीट समजावी ह्मणून पुढें दर्शवल्याप्रमाणें पत्रकें छापण्यांत येऊन तीं स्वयंसेवकांस सोपण्यांत आलीं.

विजयपुरी येथील ब्राह्मणांचें वस्तीपत्रक.

(१) अनुक्रम नं. (२) राहण्याचें-ठिकाण-जिल्हा (३) नांव (४)वय (५) ब्राह्मणांतील पोट जाति (६) स्थिति (७) उद्योग-धंदा (८) मातृभाषा कोणती व दुसऱ्या किति भाषा येतात (९) कोणती परीक्षा उत्तीर्ण (१०) इतर विद्या, कला गुण (११) विवाहित-अविवाहित विधुर, विधवा वगैरे (१२) शरीर

**प्रकृति (१३) व्यंग (१४) लिहितां-वाचतां येते कीं नाहीं? (१५) घरांतील मनुष्य संख्या स्त्री व पुरुष (१६) शेरा.**

---

## कॉष्टकाची समजूत.

(१) घराचा अनुक्रमांक लिहिणें. (२) जिल्ह्याचें व अळीचें नांव लिहिणें (३) घर मालकाचें आडनांवासह पूर्णनांव लिहिणें, मग पोटांत साधीं नांवें लिहिणें. (४) फाल्गुन अखेर जें वय असेल तें लिहिणें. (५) कऱ्हाडे, कोंकणस्थ, देशस्थ, देवरुखे वगैरे लिहिणें. (६) आपलें उत्पन्न कोणी सांगत नसल्यानें स्थितीचे पांच प्रकार ठरवून प्रत्येक प्रकारांत तीन प्रति ठरवल्या.

पांच प्रतींचीं नांवें—उत्तम, चांगली, बरी, ठीक व साधारण. मग जी प्रत असेल ती लिहिणें—जसें उत्तम नं. १ बरी. नं. २ साधारण नं. ३ घरची मनुष्य—संख्या, उत्पन्न, कर्ज वगैरेमुळें कोणाची स्थिती काय हें लोकांस माहित असतें. पण नेमका उत्पन्नाचा आकडा माहित नसतो म्हणून पत्रक भरणारानें तपास करून ऐपतीचें पुढील प्रमाण ध्यानांत घेऊन लिहिणें.

(१) १६हजार किंवा त्यापेक्षां अधिक वार्षिक उत्पन्न. (२)१५ हजार (३) १४ हजार. (४) १२ हजार. (५) १० हजार. (६) ८ हजार. (७) ६ हजार. (८) ४ हजार. (९) २ हजार. (१०) १ हजार. (११) ७ शें. (१२) ५ शें. (१३) ३ शें. (१४) २ शें. (१५) १ शें. रु. उत्पन्न.

वरील हकीकतीचें वस्तीपत्रक एक आठवड्याचें आंत सर्व स्वयंसेवकांनीं तयार करून मंडळाकडे रुजु केलें. सदर पत्रकांत कोणी पाहुणे आले असतील त्यांचीं नांवें लिहिण्यांत आलीं नव्हतीं, तसेंच विजयपुरींत रहात असून बाहेरगांवीं गेलेल्यांचीं नांवें गाळण्यांत आलीं नव्हतीं. वस्तीपत्रक तयार झाल्यामुळें कार्यकारी मंडळास पुढील सुधारणेचीं कामें हातीं घेण्यास सोइचें झालें. पुढे श्रावण शु० ५ च्या दिवशीं

---

( ७ ) उदर निर्वाहाचा जो धंदा असेल तो लिहिणें. जसे भिक्षुकी स. नोकरी शिक्षकाची, कापसाचा व्यापार, शेती वगैरे जें असेल तें लिहिणें. ( ८ ) मातृभाषा मराठी व इतरभाषा गुजराती, हिंदी, इंग्रजी, संस्कृत वगैरे. ( ९ ) मराठी ६ वी इयत्ता, मॅट्रिक, बी. ए; व्याकरण शास्त्राची, कीर्तनकेसरी, संगीत विशारद वगैरे जो परीक्षा दिली असेल तो लिहिणें. (१०) वेदविद्या, मंत्रविद्या, वैद्यक, ज्योतिष, सतारवादन वगैरे. (११) कुमार कुमारिका १२ वर्षें पर्यंत. पुढें विवाहित, अविवाहित लिहिणें. विधुर, विधवा व सकेशा, परिस्थिति प्रमाणें लिहिणें. (१२) सशक्त निकोप, मध्यम, अशक्त, रोगट वगैरे. (१३) अंध, बधिर, मुका, पांगळा, थोटा, महारोगी वगैरे. (१४) वयाचीं ६ वर्षें संपूर्ण झाल्या नंतरच्यास शिक्षित-अशिक्षित लिहिणें. (१५) स्त्री पुरुषांची संख्या लिहिणें. (१६) विशेष हकीकत लिहिण्या सारखी असल्यास लिहिणें.

दुपारीं ४ ते ६ पर्यंत सामान्य सभा बोलवून मागील झालेल्या हकीकतीचें निवेदन केलें-त्यांत एकंदर ब्राह्मणांचीं घरें २००० राजवळ जवळ नोंदली गेल्याचें सांगितलें; २००० पैकी १५०० घरच्या मालकांनीं वर्गणी भरून पटांत नांवें नोंदवलीं आहेत असें सांगितलें नंतर त्या सभेंत पुढील ठराव पसार करण्यांत आले.

( १ ) इतक्या वस्तीला २५ स्वयंसेवक कमी आहेत त एकंदर ४० करावेत म्हणजे १५ अधिक निवडावे.

( २ ) आपल्या जातींतील १२ ते २० वर्षांपर्यंतचे सर्व मुलांना बालचरचें शिक्षण द्यावें. ( स्काउटचें शिक्षण )

( ३ ) ब्राह्मणसभेनें तयार केलेला नियम छापवावा.

( ४ ) मंडळीनें जीं ध्येयें ठरविलीं आहेत तीं अमलांत आणण्यासाठीं पोटसमिति नेमून कार्यास सुरवात करावी.

( ५ ) तूर्त आपल्यास जागेची कांहीं अवश्यकता नाहीं. दृश्य असें कांहीं भरींव कार्य करून दाखवलें पाहिजे.

( ६ ) जे कोणी अद्याप गरीबीमुळें, अविश्वासामुळें, मंडळीचीं मतें पसंत नसल्यानें सभेंत दाखल झाले नाहींत, त्यां

ग्रं. ३२८

पैकीं गरीबांना माफी देऊन बाकीच्यांचीं मनें वळाविण्याचा यत्न करावा.

ह्या प्रमाणें सभेंत ठराव होऊन ६ वाजतां सभा बरखास्त झाली, सुधारणा करावयाची असें एकदां ठरल्यावर सुधारणेचा महामंत्र, "आळस सोडा व शिस्तीनें कार्यास आरंभ करा" हा विजयपुरीच्या ब्राह्मणमंडळींनीं नुसता पाठ न करितां त्या प्रमाणें सर्वांनीं झटून प्रयत्न केल्यामुळें एक वर्षानंतर बरीच सुधारणा झाली, असें त्यांस दिसून आलें, छपाईकडे बराच खर्च होतो, असें वाटल्या वरून त्यांनीं दुसऱ्या गुडीपाडव्याच्या सा. सभेंत मंजुरी घेऊन एक ( आडगिऱ्हाइकीचा नव्या सारखाच ) लहानसा छापखाना खरेदी केला. त्यांत दुहेरी फायदा झाला. दोन मनुष्याला काम मिळालें व मंडळीस थोडा खर्च येऊन छपाईचें काम होत गेलें सदर छापखान्यांत विजयपुरींतलीं कामें सुद्धां पुढें येऊं लागलीं व संस्थेस फायदा होऊं लागला.

सभेंत वर ठरल्याप्रमाणें ४।४ जणांची एक पोट-समिति मुक्रर करून त्यांजकडे ध्येयांत ठरविल्याप्रमाणें कामें वाटून

देण्यांत आलीं एकंदर अशा ६ समिति स्थापन झाल्या व त्यांना मदतगार ४० स्वयंसेवक असल्यानें कामास झपाट्यानें सुरवात झाली.

सभेनें ठरविलेल्या ध्येयांपैकीं नं. १ ते नं. ६ पर्यंतच्या ध्येया संबंधानें तज्ज्ञांकडून त्या त्या विषयासंबंधाचीं व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें करवून त्या त्या विषयांची माहिती देणारीं लहान लहान पुस्तकें लिहून फारच अल्प किंमतीनें बहुतेक ब्राह्मण मंडळींस देण्यांत आलीं व इतर ध्येयासंबंधानीं योजना घडून तयार केल्या. सर्व योजना हळुहळु अमलांत आल्या. सुधारणेचा दुसरा मंत्र " जे पटलें त्याचा अंमल दुसऱ्या क्षणापासून करणें " याही मंत्राचा केवळ जप न करितां ब्राह्मण समाजानें त्याची तावडतोब अंमलबजावणी करण्यास सुरवातच केली. नाहींतर आज दसऱ्याच्या दिवशीं आपली चार स्नेही मंडळी संध्याकाळीं पांच वाजतां आपल्याघरीं शिलंगणास जाण्यासाठीं जमतील म्हणून एका गृहस्थानें आपल्या कचेरीची जागा ( बैठक ) नीट झाडून साफ करून ठेवण्या करितां दोन केर-सुण्या दोन झटकणी आणून ठेवलीं; कांहीं तस्बिरी सोडून

ठेवल्या, व कपाटांतील जिनसा-कपाट साफ करावयाचें ह्मणून खालीं पसरून ठेवल्या; इकडल्या खुर्च्या तिकडे, तिकडले सामान इकडे पसरून ठेवलें. एक वाजल्यापासून पुतण्याला मदतीसाठीं हाका मारतां मारतां घरचे यजमान खालीं गेले व जरा झोपाळ्यावर बसले, तो गुंगी येऊं लागली ह्मणून आडवे झाले; व काचा खोंचलेला, एका हातांत झटकणें तशाच स्थितींत झोंपी गेलें. झालें इतक्यांत चार वाजले, एकेक मंडळी येऊं लागली; पुढें त्यांची काय स्थिति झाली असेल त्याची वाचकांनीं कल्पना करावी. आधीं दुसऱ्याचे दिवशीं असलीं कामें उपस्थित करावयाचीं नाहींत, आधीं केलीं पाहिजेत; व उपस्थित केलींच तर गाफल राहतां कामानये. अशा प्रमाणें विजयपुरींतील ब्राह्मण सभेची स्थिति न होतां उद्योग प्रियता, आळसाचा त्याग, कामाची चिकाटी व ऐक्य ह्यामुळें ती संस्था लवकरच उदयाला आली. ज्ञानार्जन व तदनुरूप वर्तन हाच आत्मोन्नतीचा उपाय आहे. सदर संस्थेस आतां ८ वर्षे होऊन गेलीं आहेत, त्या अवधींत विजयपुरींतील बहुतेक ब्राह्मण ब्राह्मणसभेंत दाखल झाले आहेत. हल्लीं त्या

समाजाची खालीं दर्शविल्या प्रमाणें सुधारणा झालेली पाहण्यांत येत आहे.

( १ ) पहिलें ध्येय—ब्राह्मणांनीं नास्तिक न बनतां आपल्या धर्माप्रमाणें वागणें—या ध्येया प्रमाणें विजयपुरीतील सर्व ब्राह्मण परमेश्वराचें आस्तित्व व पुनर्जन्म कबूल करतात. त्यांचे मतें परमेश्वर एक आहे. तो निर्गुण, सच्चिदानंद स्वरूप आहे; तरी भक्तांसाठीं तो सगुणरूप धारण करतो. जगताचा सर्व खटाटोप प्रकृति—माया—ईश्वरशक्ति करते. शंकर, गणपति, देवी, सूर्य, दत्तात्रय, राम, कृष्ण इत्यादि सर्व त्या परमेश्वराचेच अवतार आहेत; फारकाय पण नामरूपात्मक सर्व सृष्टि ईश्वरमय आहे. आह्मी हिंदु-ब्राह्मण सनातन धर्माचे आहोंत, ह्या धर्मांत मनुष्याला ईश्वर होतां येतें. ' नर अपनी करनी करे तो नरका नारायण होय ' ईश्वर होणें ह्मणजे नाम रूपाभासाच्या व जन्ममृत्यु जरा दुःखादि धर्माच्या अतीत होणें, ह्मणजेच मुक्त होणें. अशा या सनातन धर्मांतल्या हिंदूना वेद हे प्रमाण ग्रंथ आहेत; कर्म, योग, भक्ति, ज्ञान वगैरे मोक्षमार्गाचीं अनेक साधनें आहेत; उपासना कोणाचीही केली तरी चालते. गंगा, नर्मदादि

दा. क. ..........

नद्या, तुळस, अश्वत्थ औदुंबरादि वृक्ष, यात्रेचीं पुण्यक्षेत्रें, आणि गाय हीं सदा पवित्र आहेत. साक्षात्कारी साधु-संत योगी, भगवद्भक्त, भगवद्गीता व चातुर्वर्ण्य हीं सर्व तेथील ब्राह्मणांना मान्य आहेत. त्याला अनुसरून, ह्याच्यांत काय आहे ? त्याच्यांत काय आहे ? असें बोलून ब्राह्मणांनीं नास्तिक न होतां शक्य तें आपलें आश्रमानुरूप कर्म केलें पाहिजे ह्मणून तेथील सर्व ब्राह्मण सूर्योदयापूर्वीं नित्य पाउणतास लवकर उठतात. भक्तीपूर्वक थोडी ईश्वर-प्रार्थना करून प्रातर्विधि आटोपून सूर्योदयापूर्वीं स्नान करतात. कोणीही ब्राह्मण सकाळची व संध्याकाळची संध्या केल्या शिवाय रहात नाहींत. तेथील ब्राह्मण शेंड्या किंवा मिशा काढीत नाहींत; तसेंच कोणाचे भांग पाडण्या सारखे फेंदारलेले केस असत नाहींत; त्यामुळें स्नान झाल्यावर फणी घेऊन आरसा पाहात त्यांस केस विंचरण्याचा

---

१ लहान मुलें, वृद्ध, रोगी कारणपरत्वें रात्रीं जागणारे लोक व अशक्त माणसें लवकर उठत नाहींत आणि स्वधर्म, आरोग्य, चांगुलपणा याची पर्वा न करणारी मंडळीही लवकर उठत नाहींत, या हट्टी व आळशी मंडळींस बोलण्या पलीकडे कांहींच करावयास नको असते.

प्रसंग येत नाहीं. मोठी शेंडी ज्यांस नको असेल ते एक लहान बट तरी ठेवतात. मिशाची अडचण वाटत असल्यास त्या ७-८ दिवसाचे वाढलेल्या केसा इतक्या तरी ठेवतात, मात्र कित्येक जण शिरोमुंडन नको असल्यास नुसती दाढी करवितात, तरी दररोज दाढी करण्याची त्यांस अवश्यकता वाटत नहीं. हें साडेतीन हाताचें शरीर म्हणजेच मी असें मानून त्याचे फाजील चोचले करीत बसणें हें ईश्वरापासून दूरदूर जाण्या सारखे आहे असें ते मानतात. शेंडी-मिशा हे धर्माचें एक उपांग लक्षण आहे असें ते समजतात. पण त्यांतहीं त्यांनी शिस्त ठेवली आहे.

प्रत्येकाचे घरी एक इष्ट दैवत, कुलदैवत फार तर देवाचें एक पंचायतन-तें सुद्धां शास्त्रोक्त लहान असें असतें. त्या ५।७ देवां शिवाय अधिक देव कोणाकडेही नसतात. देवाची पूजा करण्याचें काम स्त्रियांकडे किंवा लहान मुलांकडे न सोपतां ते आस्थापूर्वक स्वतः पूजा करतात. ह्या आन्हिककर्माकडे अर्धा ते तीन तास पर्यंत ज्याच्या त्याच्या सवडीप्रमाणें वेळ खर्च केला जातो. कित्येक निर्गुण उपासना करतात. मुंज झाल्या नंतरच्या

मुलापासून सर्व ब्राह्मणमंडळी सूर्याला नमस्कार घालतात, त्यामुळें त्यांच्या प्रकृति चांगल्या राहतात. प्रत्येक ब्राह्मणाला भस्मधारणमंत्र, यज्ञोपवीतधारणमंत्र, संध्या, नमस्कार, पुरुषसूक्त, पूजा, सौर, रुद्र, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, त्रिसुपर्ण व भगवद्गीतेचा १५ वा अध्याय इतके आलेंच पाहिजे, ह्मणून आपल्या मुलांच्या ह्या ब्रह्मकर्माच्या शिक्षणाची त्यांनीं तजवीज केली आहे व आपण स्वतःही शिकून तयार झाले आहेत. आह्मांला वेळ नाहीं अशी लंगडी सबब कोणी सांगत नाहींत. प्रत्येकाचे घरीं नैवेद्य–वैश्वदेव होतो. बायकाच चुलीमधें आहुती टाकीत नाहींत. प्रत्येकजण सोंवळें पाळतो. घाणेरडे सोंवळें कोणी ठेवीत नाहींत. स्वच्छ धुतट वस्त्र-बाहेर हिंडून आल्या शिवायचें आपण धुतलेलें असलें ह्मणजे तें मानलें जातें. चामड्याचे पट्टे, विजार, टोपी, सदरा घालून कोणी जेवीत नाहींत.

श्रावणीसारखे धर्मविधि मोठया उत्साहानें गडबड केल्या-शिवाय आचरण्यांत येतात. कोणीतरी दिलेलें व कुठलें तरी जानवें वरवर कोणी घालीत नाहींत. वेद शास्त्रं पुराणें संस्कार विधि, व्रतें उद्यापनें, होम, प्राणप्रतिष्ठा केलेल्या मूर्ति

सवझूट मानून कोणीही त्याची टर उडवींत नाहींत. जें आपल्यास उमजत नाहीं तेवढया भागाकडे ते दुर्लक्ष्य करतात. देव व देवळें वायकालांच न सोपतां बहुतेक मंडळी नित्य नियमानें देवदर्शनास जातात. देव तेवढा निराकार निर्गुणी व विषयभोग मात्र विविधाकार व बहुगुणी असें कोणी मानीत नाहींत. ते पुनर्जन्म मान्यकरून मृतसंस्कार यथोचित करून मृताचें श्राद्धपक्षादि करतात. आज्ञा पाळणें हा धर्म । स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । भावेनदेवः । तुकाह्मणे नासी । कुतर्क्याचे कपाळीं । ह्यांतील मर्म त्यांना उमजलें आहे. देव धर्म-कर्म-उपासना-ज्ञान ह्याला आगदीं विसरून लालसा वाढवून केवळ विषयोपभोगांतच दंग होऊन राहण्यासाठीं ब्राह्मणांचा जन्म नाहीं. आपली संस्कृति व आपला धर्म आपणच संरक्षण केला पाहिजे, असें तेथील ब्राह्मणांचे मत बनलें असून त्याप्रमाणें ते वागत आहेत.

दुसरें ध्येयः—पाहिल्या नंबरची स्वच्छता व शिस्त पाळून बोलण्याचालण्यांत मेळ असणें—ब्राह्मण समाजांतील बहुतेक मंडळी उत्तम स्वच्छता राखून यूरोपीयनाइतकी शिस्त पाळः

तात. ते राहतात त्या गल्लींतील, रस्त्यावरील, आपल्या घराभों-वतालची जागा व राहत्या घरांतील अगदीं शौचकूपापासून थेट कचेरीपर्यंतची जागा फारच स्वच्छ राखली जातें. एकदा भंगी रस्ता झाडून गेला कीं, रस्त्यावर कोणीही कागद, कचरा, घाणेरडे पदार्थ, खरकटें, गलिच्छ पाणी टाकत नाहींत. माडी-वर राहणारे लोक खालीं येऊन कचरा टाकतात, वरतूनच कोणी कचरा फेकून देत नाहींत. प्रत्येकाचे घरापुढें सडा-संमार्जन करून रांगोळी घातलेली असते. सर्व दिवसभर रस्ता अगदीं स्वच्छ ठेवला जातो. तसेंच कोणाचेही घरीं जाऊन पाहिलें असतां तेथें जाळीं, कचरा, घाण किंवा अव्यवस्था आढळत नाहीं. घरांत दरेक वस्तू जमिनी-सरशी ठेवलेली दिसत नाहीं; त्यामुळें कोठार, सैपाकघर, देवघर वगैरे चांगलें झाडलें जातें. प्रत्येक वस्तू योग्य ठिकाणीं-अंधारांत सुद्धां ती वस्तू सांपडेल अशा शिस्तीनें ठेवलेली असते.

तेथील बहुतेक स्त्री-पुरुष-मुलें शिस्तीनें वागतात. सर्व मुलांना बालचरचें ( स्काउट ) चें शिक्षण सक्तीनें दिलें जातें. मात्र फार सवईनें मनमुक्त वागणाऱ्या मंडळींना अद्याप

शिस्तीचें वळण लागलें नाहीं. तेथील ब्राह्मण दागिन्याप्रमाणें मनगटावर घड्याळ बांधून मनास वाटेल तसें न वागतां ते खिशांत घड्याळ ठेवतात, व उठणें-झोंपणें जाणें-येणें, खाणें-पिणें वगैरें सर्व वागणूक ठरवलेल्या वेळेप्रमाणें ठेवतात. रोजच्या दिनचर्येस जशी शिस्त असते त्याप्रमाणें उपहाराचे मेजवानीचे, लग्न-मुंजीचे व देवादिकांच्या उत्सवासारखे एकंदर कार्यक्रम अगदीं आखीव, टापटिपीचे व वक्तशीर पार पाडले जातात. दरेकाची राहणी इतकी शिस्तीची झाली आहे कीं, लग्न-मुंजीच्या अक्षतींत, मिरवणुकींत चालतेवेळीं मागें-पुढें-मध्यें बरेंच अंतर टाकून झुंडी-झुंडीनें किंवा घोळक्यानें न चालतां अगदीं एकेका ओळींत हारबंद स्त्रिया मुलें व पुरुष चालत जातात. त्यामुळें ती सर्व मिरवणूक प्रेक्षणीय वाटते.

अगदीं लहान मुलापासून तों थेट म्हाताऱ्या माणसा पर्यंत सर्वांचे कपडे स्वच्छ असतात. तसेंच वाटेल त्याठिकाणीं नाक शिंकरून हात पुसणें, पान खाऊन चांगल्या जागीं पिच कारी मारणें, थुंकणें, चांगल्या ठिकाणीं लघुशंका करून घाण करणें, विड्या पिऊन वाटेल तेथें विझवणें व टाकणें वगैरे

वाईट सवयी आतां कोणाच्या राहिल्या नाहींत. फार तर काय पण लहान मुलास सुद्धां रस्त्याच्या भिंतीवर खडूनें रेघोट्या काढूं नये कीं कांहीं सुद्धां लिहून ठेवूं नये हें समजतें.

तेथील ब्राह्मणांना आतां असा पश्चात्ताप वाटत आहे कीं इतके दिवस आम्ही-सुशिक्षित लोक यूरोपियनांचे सान्निध्यांत असूनही त्यांचे, धाडस सामान्य स्वच्छता, शिस्त, वक्तशीरपणा, उद्योगप्रियता, कामाची चिकाटी वगैरे सद्गुणांचें अनुकरण न करतां त्यांचे हॉटेलांतील खानपान, चहा, केसाचा भांग, रोजचा क्षौर, नेकटाय कॉलरचा पोशाक, मिथ्या अहंकार आणि इतर दुर्व्यसनें ह्यांचें मात्र आम्हीं मनापासून अनुकरण केलें! पण झालेली चुकी आतां त्यांनीं सुधारली आहे.

तिसरें ध्येयः—कोणाशीं द्वेष न करतां ऐक्य वाढेल तो प्रयत्न करणें—नित्यशः ह्या ध्येयासंबंधाचीं व्याख्यानें ऐकून आतां तेथील ब्राह्मणांत अशी सुधारणा झालेली पाहण्यांत येत आहे कीं, द्वेषभाव वाढल्यामुळें कित्येक राज्यें रसातळाला गेलीं, कित्येक चळवळी लयाला गेल्या, कित्येक

कर्ते पुरूष नाश पावले ह्याची तेथील ब्राह्मणांस चांगली जाणीव असल्यामुळें ते आपल्या जातीजातींत कोणाचा, किंवा दुसऱ्या जातीचे मनुष्याचाही द्वेष करीत नाहींत. त्यांस जात्याभिमान आहे, धर्माभिमान आहे; परंतु अन्य धर्माचे-जातीचे मनुष्याचा ते उगीच निंदा करीत नाहींत, द्वेष करीत नाहींत कीं नसतीं विधानें त्याचे अंगीं लावीत नाहींत. माझाच मार्ग इतरांनीं आक्रमावा असा हट्ट धरीत नाहींत; व त्यामुळें मनांत द्वेष नसल्यानें इतरांच्या मार्गांत कोणी काटे पेरून ठेवीत नाहींत. एरवीं मतभेदानें सभेंत, कचेरींत मोठे कडाक्याचे वादविवाद होतात पण अंतस्थ द्वेष असा कोणी कोणाचा करीत नाहींत. तेथील ब्राह्मणांत इतकी जूट चांगली आहे कीं, अन्य जातीचे मंडळीस त्यांचा हेवा करावासा वाटतो.

एखादेवेळीं कोणा ब्राह्मणांवर किंवा अन्य जातीयावर संकट आलें असतां किंवा तो अडचणींत फसला असतां तमासगिराप्रमाणें त्याचा तमाशा पहात कोणी उभे न राहतां एक जुटीनें त्याची संकटांतून सुटका करण्यास मदत करतात.

'मला काय त्याचें' 'आमचा काय त्याच्याशीं संबंध' असले विचार आतां कोणाच्या डोक्यांत राहिले नाहींत.

चौथे ध्येयः—सर्व ब्राह्मण-समाज सद्‌गुणी व शीलवान बनेल तो यत्न करणें. ज्या कमेटिकडे ह्या ध्येयाचें काम होतें त्यांनीं अशी योजना केलीकीं, स्वयंसेवकामार्फत मंडळीचे गांवात किती गट आहेत त्याची नोंद केली, एका गटांत पाचापासून वीसापर्यंत मंडळी आढळण्यांत आली. समानशीलाचीच मंडळी, व्यसनेषु सख्यम् असल्यानें एका बैठकींत जमावयाची. त्यांचे स्वभाव सारखे, मतें एक प्रकारचीं, आवड एक प्रकारची, व व्यसनही सर्वांना एकच-ह्याला अपवाद असतील. पण थोडे. कमेटीच्या मंडळीनीं त्या प्रत्येक गटाला आपल्याकडे बोलवून किंवा त्या गटांत जाऊन वरील ध्येय कसें अमलांत आणावें हें त्यासच विचारीत. सर्वांस ह्या गोष्टीचें उत्तर देण्यास कठीण वाटे. ब्राह्मण समाज सद्‌गुणी शीलवान असावा हें त्यास पटे. पण न कर्त्याचा वार शनिवार. त्यावर त्याची ठरावीक उत्तरें येत असत, (अ) ह्या कलियुगांत आतां हें करूं पाहणें कठीण आहे. अहो ही गोष्ट व्हावयाचीच नाहीं (इ) तुमचें

सांगणें अव्यवहार्य आहे. (ई) सद्‌गुणी व शीलवानाला काय लाभ आहे? नळ, राम, युधिष्ठिर, ह्यांनीं शील संभाळलें पण लाभ काय तर वनवास! संभाजींनीं शील राखिलें पण लाभ काय तर डोळे फोडून घेणें! असेंही उत्तर एखादजण देत असे. कित्येक संतापतही असत पण कमेटीच्या मंडळीनें त्यांस हार न जातां त्यांस विचारावें कीं, खऱ्या व्यवहारानें चालणें कोणास न फसविणें, अन्यायानें न वागणें, चोरी न करणें व्यसनें सोडून देणें, व्यभिचारी न होणें, माता-पित्यांच्या-गुरुच्या आज्ञेंत वागणें, धर्मप्रमाणें चालणें, स्वाभिमान, जात्या-भिमान देशाभिमान बाळगणें परोपकार करणें, ज्ञानार्जन करणें वगैरे ह्या सर्व बाबती वाईटच ह्मणावयाच्या तर! काय तुह्माला वाटते सांगा. गटाची मंडळी ह्मणे वाईट नाहीं; पण असें कोणीं वागूं शकणार नाहीं. कमेटीनें प्रत्येक व्यक्तीस विचारलें कीं, तुम्ही असें वागाल किंवा नाहीं? व्यसनें-असल्यास सोडाल कीं नाहीं? त्यांत काय कठिण आहे? तुह्माला ह्यांत कांहीं पैशाचा सुद्धां खर्च नाहीं. तुह्मी निश्चय कराल तर तें होईल; एकदम स्वभाव बदलणार नाहीं. पण

हें प्रयत्नसाध्य नाहीं कां ? अहो, अफूसारखें व्यसनही चीन देशाचें सुटलें. पहा विचार करा.

ह्या सारख्या उपदेशानें, व्याख्यानानें बहुतेक मंडळी आपला वाईट स्वभाव सोडून शीलवान् व सद्गुणी झाली आहेत त्यांची आतां अशी पक्की खात्री झाली आहे कीं, रोजच्या व्यवहारांत व्यापारांत, कचेरींत म्युनिसीपालिटीसारख्या संस्थेंत, खोटें बोलणें, लबाडी, फसवेगिरी, लाचलुचपत, विश्वासघातासारखे दुर्गुण जोंपर्यंत वावरत आहेत तोंपर्यंत जनतेला सुख मिळण्याची आशाच करावयास नको. ह्मणून तसले दुर्गुण आतां तेथें फारसे पाहण्यांत येत नाहींत, शेजाऱ्यांशीं त्यांचे भांडणतंटे नाहींत; अकृतज्ञता, चोरटेपणा, चहाडखोरपणा व हरामखोरपणा तेथील ब्राह्मणमंडळींत आढळत नाहीं. उसनवार घेतलेले पैसे कोणीही बुडवीत नाहीं. सर्व सामान्य न्यायनीतीचें वर्तन कोणत्याही धर्मास पंथास आड येण्यासारखें असत नाहीं. तसेंच सद्गुणी व शीलवान होण्यास एक पैचाही खर्च लागत नाहीं. त्यांत कांहीं जर कठीण असेल तर आळस

टाकून मनाचें संयमन करून निश्चयानें वागणें. ज्यापासून सर्व मानवजातीचें कल्याण साधत असून चहुंकडे शांति प्रस्थापित होते तें तत्व लोक कां अमलांत आणीत नाहींत ह्याचें तेथील ब्राह्मण-मंडळींस आतां आश्चर्य वाटूं लागलें आहे.

पाचवें ध्येयः-दुर्व्यसनें व आळस सोडून उद्योगप्रिय होणें. विजयपुरीच्या ब्राह्मणमंडळींत कोणीही मद्यपी, गांजेकस अफुखाणारे, नित्यशः भांग पिणारे नाहींत. तमाखू, तपकीर विड्या ओढणारे पुष्कळ आहेत. तरी सिगार किंवा चिरुट कोणीच ओढीत नाहींत. शिवरात्रीसारख्या प्रसंगीं मंडळी भांग करितात, जलसा असेल तेव्हां कॉफी करितात. कित्येक कॉफी, कोको सुद्धां पीत नाहींत, चहातर शेंकडा ९० पीत नाहींत. बाजारांतल्या हॉटेलमधें जाऊन कांहीं सुद्धां खावयाचें नाहीं अशी त्यांनीं शपथ घेतली आहे. तेथील सर्व ब्राह्मण उद्योगी आहेत. कोणी वेदाध्ययन, ज्योतिष, कोणी कीर्तन, वैद्यक, कोणी शेती, व्यापार कोणी वकीली कोणी डॉक्टरी कोणी नोकरी वगैरे उद्योग करीत आहेत. सर्व सामान्यपणें त्यांची दिनचर्या अशी आहे:—

| तास. | उद्योग. | तास. | उद्योग. |
| --- | --- | --- | --- |
| ०॥ | शौच-मुखमार्जन-स्नान. | १॥ | वाचनालय. |
| १॥ | दोन्हीसंध्या, पूजा,-वैश्व-देव, स्तोत्रपाठ. | १॥ | ज्ञानार्जन,(अध्यात्मिक व इतर.) |
| १॥ | व्यायाम,फिरणें–हिरणें. | १॥। | लोक हितकार्य( मफत ) |
| ॥। | बाजारची ने–आण व हिशेब लिहिणें. | १ | दोन्ही जेवणें. |
| ६ | उदर व्यवसाय. | ८ | झोंप. |

---

२४ तास.

सवडी प्रमाणें त्यांत थोडा फेरफार असतो. असो, आळसाला तेथें मुळींच आश्रय नाहीं ह्मणून नैष्टिक ब्रह्मचारी, सात्विक पांतस्थ, विद्यार्जन करणारा व शुद्धाचरणी यति ह्या शिवाय तेथें कोणाला मधुकरी किंवा भोजन मिळत नाहीं. तसेंच, निरुद्योगी व लबाड पाहुण्यास त्यांचे येथें एक दिवसा पेक्षां अधिक थारा मिळत नाहीं, अगदीं गरीब ब्राह्मण, सांप्रदायिक आणि अग्निहोत्री वगैरे शिवाय कोणाला तेथें भिक्षा

घालत नाहींत. अगदीं अपंग व निराधार वृद्ध ह्यांस धर्मादाय फंडातून पोसण्यांत येतें.

सहावें ध्येयः-जें समजलें व पटलें ती सुधारणा करण्यास दुसऱ्या क्षणापासून आरंभ करणें—सर्व ध्येयांत हेंच ध्येय अगत्याचें आहे. सर्वांना सर्व कांहीं कळतें आहे. मोठीं माणसें कथा-पुराण-व्याख्यान ह्यांत जाऊन नवीन काय ऐकून येतात? पण समजल्या-पटल्याप्रमाणें वागण्याचा कोणी आरंभच करीत नाहींत! त्याला कांहीं इलाज नाहीं.

अहो, जागृत असून झोंपेचें सोंग घेऊन निजणाऱ्याला कसें जागें करावयाचें! खरोखर, निजला असेल त्याला जागें करतां येतें. पण सुदैवानें विजयपुरींतल्या ब्राह्मणमंडळींना हें तत्व नीट समजल्यामुळें सर्व समाज खडबडून जागा झाला. त्यामुळें त्यांनीं आपली झटपट सुधारणा करून घेतली. कारण नित्यशः एकेक दिवसानें मनुष्याचें आयुष्य क्षीण होत आहे. ह्मणून आपली उन्नति लवकर न करतां, कुठेंतरी रहावें कांहींतरी खावें; आणि कसेतरी जगावें असें आपल्या ब्राह्मणाचें रडकें ध्येय नाहीं हें तेथील ब्राह्मणमंडळीस आतां पूर्ण पटलें आहे.

सातवें ध्येयः—ब्राह्मणांच्या उद्योग-धंद्याविषयीं विचार करून त्यांत सरळता करून देणें. अगदीं पूर्वी ब्राह्मणांची उपजीविका यज्ञ-करविणें, वेद-शास्त्र पढविणें, पुराण सांगणें व प्रतिग्रह ह्यावर चालत असे; परंतु आतां तो काल बदलला आहे. हल्लीं जेथें स्वयंपुरोहित सारखीं पुस्तकें निर्माण झालीं, तेथें ब्राह्मणांना विचारतो कोण ! तरी पण विजयपुरी येथील सर्व ब्राह्मणांनीं एकंदर साधक बाधक गोष्टींचा विचार करून त्यांनीं खालील प्रमाणें निर्बंध ठरवला आहे.

कसाही विपरीत काल आला व त्यामुळें कोणताही रोजगार धंदा करण्याचा प्रसंग आला तरी ब्राह्मणांनीं धर्म-भ्रष्ट होऊं नये आपला वैदिक धर्म राखावा आपली संस्कृति राखावी आपली भाषा व आपला पोशाक कायम ठेवावा.

दरेक घरांतील यजमानानें आपला एक पुरोहित नक्की करून आपले कुलधर्म कुलाचार गर्भादान मुंज-लग्नादि संस्कार श्राद्ध-पक्ष वगैरे प्रसंगीं आपले पुरोहितास भोजन देऊन त्या त्या प्रसंगाची सर्व दक्षिणा त्यास द्यावी, अंत्यसंस्कारही त्याचे

मार्फतच करवावें पुरोहितास हलकें लेखूं नये. तसेंच चातुर्मास अधिकमास, दशहार, देवादिकांच्या उत्सवप्रसंगीं, कीर्तन, पुराण, प्रवचन, मंत्रजागरण व भजन ह्यांचे कार्यक्रम अवश्य ठेवावे म्हणजे ब्राह्मणाचा वैदिक धर्म व पुरातन धंदा कांहींतरी जिवंत राहील व तो करणारास उत्तेजन मिळेल.

ब्राह्मणाचा दुसरा पवित्र धंदा म्हटला म्हणजे शिक्षकाचा धंदा. तो साध्य व्हावा म्हणून आपल्या मुलांसाठीं आपणच शाळा काढून चालविल्या पाहिजेत म्हणजे शिक्षकाचा धंदा चांगला चालेल पालकांनींही आपली मुलें ह्याच शाळेंत पाठवावीं. ज्यांना वकील, डॉक्टर, इंजीनियर, प्रोफेसर, वगैरे व्हावयाचें असेल त्यांनीं कॉलेजचें शिक्षण घ्यावें त्यांत हुषार अशा गरीब विद्यार्थ्यांस सभेकडून शक्य ती मदत केली जाईल.

वरील धंद्यांत अनुकूलता वाटत नसल्यास ब्राह्मणांनीं इतर व्यापार-शेती, हुन्नरकला, कॉन्ट्रॅक्टठेवणें, सरकारी नोकरी, वगैरे व्यवसाय करावे, ब्राह्मणांनीं हॉटेल काढूं नये व खानाव-

---

१ विजयपुरींत ५।७ खानावळी आहेत. त्या १-२ ब्राह्मणसावकारांनीं नोकर ठेवून चालवल्या आहेत. त्यांत जो नफा होईल तो ब्राह्मण सभेंत धर्मादाय फंडाकडे जमा केला जातो.

ळीचा धंदा करूं नये. व इतर आगदीं हलके धंदे करूं नयेत. स्त्रियांनीं स्त्री-शिक्षकाचा, स्त्री-बालरोगचिकित्सकाचा व नाइलाजास्तव सुइणीचा, वगैरे धंदा, आपला धर्म व शील संभाळून करावा. धर्मार्थ सुइणीचा धंदा करण्यास हरकत नाहीं. वरील निर्बंधाला अनुसरून तेथल्या ब्राह्मणांनीं आपले व्यवसाय चालू ठेवले आहेत; तेथील वैदिक, याज्ञिक, शास्त्री, पुराणीक कीर्तनकार व मंदीरचे बुवा, ह्या सर्वांचा योगक्षेम चांगला चालला आहे. तसेच स्वदेशी मालाचीं व संसारांत लागणाऱ्या बहुतेक जिनसांचीं ब्राह्मणांची कितितरी दुकानें आहेत; तीं चांगलीं भरभराटीत आहेत. कित्येक शेती करतात; तरी पण नोकरी करणारांचाच वर्ग अधिक आहे.

आठवें ध्येय—संस्थेच्या कार्यासाठीं द्रव्य-साह्य मिळविणें. ब्राह्मण-सभेच्या मासिक वर्गणीचे जवळजवळ ४०० रुपये येतात मासिक वर्गणी ज्यांनीं जी कबूल केली आहे ती ते पांच तारखेच्या आंत सभेकडे अचूक भरतात. वर्गणीच्या वसुली साठीं धक्के खावे लागत नाहींत. विजयपुरी येथील ब्राह्मण मंडळींतील मुंज-लग्न वगैरे कार्यप्रसंगीं कार्य-कर्त्यांच्या परि-

स्थितिप्रमाणें कांहीं रकम ब्राह्मणसभेस दिली जाते. अद्यापि धंद-शिक्षणशाळा उघडण्याइतकी रकम जमली नाहीं. हल्लीं सभेचा एकंदर फंड २५ हजार पर्यंत आहे. सभेचे प्रतिनिधि द्रव्यसाह्य मिळविण्याचे प्रयत्न करीत आहेत.

नववें ध्येय—ब्राह्मणजातीसाठीं एक वाचनालय व पुस्तकालय उघडणें व शिक्षण-संस्था काढणें—ह्या ध्येयाच्या कमेटीनें अशी योजना केली की, पटावर असलेल्या सभासद मंडळींत खानगी कोणती-कोणती वर्तमानपत्रें व मासिकें आपले नांवावर कोण-कोण मागवीत असतात. त्याची एक नोंद केली. त्या प्रमाणें चांगलीं वाचनीय १२ वर्तमान पत्रें व १५ मासिकें मालकांकडून वाचावयास मिळावीं अशी तजवीज केली. गांवात दाखल झाल्याच्या २ रे दिवशीं तीं सार्वजनिक वाचनालयांत देण्यांत येत असत. प्रारंभीं कोणासच वर्गणी ठेविली नाहीं. वाचनालयाचें स्थान पान ६ वर सांगितल्याप्रमाणें एका खानगी जागेंत ठरवलें होतें. २।३ वर्षांचे अवधींत वाचावयाची लोकांत अभिरुचि बरीच उत्पन्न झाली. पुढें मंडळींनीं वर्गणी जमवून पांच वर्षानंतर इमारत बांधावयास

सुरवात केली. खालचे भागांत वाचनालय व पुस्तकसंग्रह व वरील भागांत ब्राह्मणसभेचें कार्यालय अशी योजना करण्याचें ठरवलें आहे. ती सर्वांस पसंत आहे. ह्या पांच वर्षांच्या मुदतींत विजयपुरींतील ब्राह्मणमंडळींकडून २ वर्तमानपत्रें व ३ मासिकें प्रसिद्ध होऊं लागलीं. त्यामुळें छापखानाही वाढवावा लागला असून दिवसेंदिवस त्याचो भरभराट होत आहे. ज्ञानसंपादन करणें हें मनुष्याचें प्रथम कर्तव्य आहे. ऐकून, पाहून व वाचून ह्या तीन साधनांनीं मनुष्यास ज्ञान संपादन करितां येते; त्यालाच अनुसरून गांवांत हें वाचनालय व पुस्तकालय स्थापन झाल्याकारणानें सर्व ब्राह्मणमंडळींत लहानापासून थोरांपर्यंत ज्ञानार्जनाची चांगली सोय झाली आहे. सदर वाचनालयांत धार्मिक, सामाजिक, व राजकीय विषय प्रतिपादन करणारीं सर्व तऱ्हेचीं वर्तमानपत्रें आणि मासिक पुस्तकें येत असतात. वर्गणीही भरपूर मिळत असल्यानें वाचनालयाचा सर्व खर्च भागला जातो.

**मुलांमुलींच्या शिक्षणाची सोय करणें:**—विजयपुरींत मुलांमुलींसाठीं सरकारी मराठी शाळा व हायस्कूल वगैरे आहेत. एक कॉलेजही आहे. तरीपण तेथील

ब्राह्मणमंडळींनीं मुलामुलींकरितां ८।१० शाळा चालविल्या आहेत. त्यांच्याकरितां तेथील विद्वानांनीं सर्वोत्तम आणि स्वतंत्र क्रमिक पुस्तकें तयार केलीं आहेत. घोकंपट्टीचे फाजील विषय कमी करून उपयुक्त शिक्षण दिलें जातें. आधीं लिहितां वाचतां येण्यापुरतें शिक्षण मुलामुलींना आईबापाकडून घरींच दिलें जातें. चार वर्षांच्या अभ्यासक्रमानंतर मुलें लेखन, वाचन, गणित, व्याकरण, इतिहास, भूगोल, सामान्य सृष्टिज्ञान संकृत एक पुस्तक व उत्तम कविता ह्मणतां येणें ह्या विषयांत तयार होतात. त्याबरोबर थोडीशी चित्रकला, संगीत, व कसरत हेही विषय शिकविले जातात. मुलामुलींच्या परीक्षा कसून घेतल्या जातात. हीच यांची प्रवेश परीक्षा. ह्या परीक्षेनंतर ४।५ शाखा फुटतात. वेद, शास्त्र, पुराण व्याकरण वेदांत शिकण्याची शाखा; आर्य वैद्यक, ज्योतिष शाखा; कीर्तन, गायन, वादन, चित्र शाखा; देशीधंदे शिकण्याची शाखा, व्यापारशिक्षणशाखा, व पाश्चिमात्यशिक्षणशाखा, सर्व शाखेंतील विद्यार्थ्यांना व्यवहारापुरतें इंग्लिश व हिंदी शिकविण्यांत येते. त्यामुळें त्यांचे शिक्षणांत एकांगीपणा रहात

नसून तुलनात्मक दृष्टि, व्यवहारचातुर्य व निर्भयता असे गुण अंगीं येतात. त्या त्या शाखेंतल्या प्रवीण अध्यापकाकडून विद्यार्थ्यांस शिक्षण दिलें जातें. मुलींकरितां उच्चशिक्षणाची शाळा आहे. ह्या शाळेंत सर्व स्त्री-शिक्षक आहेत. ह्या शाळेचा अभ्यासक्रम ३ वर्षांचा आहे. संस्कृत, मराठी, इंग्लिश, हिंदी, रांगोळ्या, शिवणकाम, गायन वादन, पाकशास्त्र, नीतिशास्त्र, स्वच्छता व आरोग्य, वगैरे विषय शिकवले जातात. कॉलेज-मध्ये फार थोडीं मुलें जातात. स्वतंत्रपणें पुढे धंदा करिता येईल असलें शिक्षण घेण्याकडेच मुलांचा कल विशेष असतो. प्रौढ स्त्रियांकरितां स्त्री-उद्योगालयें आहेत. तेथें स्त्रियांना योग्य असे कला कौशल्याचे विषय शिकविण्यांत येतात तसेंच प्रपंच-शास्त्र, स्त्रीरोगचिकित्सा बालसंगोपन ह्यांही विषयांची माहिती देण्यांत येते.

राष्ट्राची उन्नति व अवनति केवळ लहान मुला-मुलींच्या शिक्षणावर अवलंबून असते. एम्, ए; एम्, डी; किंवा आय. सी, एस्. होणें हें खरें शिक्षण नव्हे. मुलें शीलवान, सत्यप्रिय धार्मिकवृत्तीचीं, मातृ-पितृभक्त, राष्ट्रभक्त, निरोगी, पराक्रमी

विद्वान् निपजलीं पाहिजेत, अशी त्यांची समजूत आहे; व त्याप्रमाणें मुला–मुलींना शिक्षण देण्याची तजवीज त्यांनीं केली आहे.

दहावें ध्येय:–धंदे शिक्षण देणारी संस्था उघडणें व देशीवस्तूचा प्रसार करणें:–पैकीं पैशाच्या अभावीं धंदेशिक्षण संस्था अद्याप उघडण्यांत आली नाहीं, पण 'स्वदेश वस्तुभांडार' ह्या नांवाचें दुकान स्थापन करण्यांत आलें आहे. विजयपुरींतील सर्व ब्राह्मणमंडळींतील तीन चतुर्थांश लोक स्वदेशी मालाशिवाय अन्य जातीचा (कोणताही) माल वापरीत नाहींत. स्वदेशांत तयार झालेली वस्तु वापरणें हा दरेकाचा धर्म आहे: म्हणून तेथील मंडळी खालीं दर्शवल्याप्रमाणें माल वापरतात.

(क) हातांनीं विणलेलें आणि गिरणीचें देशी कापड.

(ख) सत्रंज्या, जाजमें, छत्र्या, कनाती, पडदे वगैरे देशी.

(ग) कोणीही विजेचे दिवे न घेतां देशी कारखान्यांतले काचेचे दिवे, मेणबत्त्यांचे बैठे दिवे, व बर्मा-ग्यासलेट वापरतात, कित्येकजण दिवेल-तेलाचेही दिवे वापरतात.

(घ) सायकल फार थोडे लोक वापरतात व मोटर तर कोणीच वापरीत नाहींत.

(ङ) बहुतेक मंडळी देशी साखर वापरतात.

(च) चाकु, कातरी, सुरी, साबु, चमचे, कपबशा, उडविण्याचीदारु, भांडीकुंडी, जोडे, वगैरे तमाम जिन्नस स्वदेशी बनलेले वापरतात.

(छ) सहसा कोणी विदेशी औषधें घेत नाहींत. वर वर्णन केलेल्या शिवाय इतर जिनसा देशी कारखान्यांत तयार झालेल्या मिळाल्यास ते वापरतात.

नाइलाजानें अद्याप घडयाळासारखे जिन्नस घ्यावे लागत आहेत. कोणाच्याही घरांत जाऊन आपण सहज नजर टाकली तर, क्वचितच विदेशी वस्तु नजरेस पडते. स्वदेशी वस्तु वापरणारी मंडळी पुष्कळ असल्यानें दुकानही चांगलें चाललें आहे. श्रीमंताचे घरीं घोड्याची गाडी आहे. मध्यम प्रतीच्या लोकांनीं चौघांमध्यें एक गाडी ठेवली आहे; सर्वजण-बखेड्या

शिवाय-आनंदानें त्या गाडीचा उपयोग करितात. अडचणीच्या वेळीं पायींही फिरावें लागतें, पण सहसा कोणी सायकल घेत नाहींत, त्यामुळें कित्येकजण त्यांना हिणवतात कीं,-काय हो किति तुह्मी वेडे अहांत! चांगल्या मोहक सुखसोयीच्या जिनसा सोडून, देशी भिकार कपडे काय वापरतां! दिवेल काय जाळतां! काळ्यासाखरेचे पदार्थ काय आवडीनें खातां! सायकली सोडून पायींच काय भटकत फिरतां? काय हें! ह्मणावें तरी काय तुह्मांस!

त्यावर ती मंडळी मार्मिक उत्तर देत असते कीं,-अहो हें पहा, तुह्मांला ज्या जिनसा व जीं साधनें सुख-सोयीचीं वाटतात तीं अह्मांस वाटत नाहींत असें नाहीं; पण ज्या माणसास दमा-खोकला झाला आहे त्याला तेलकट चुरचुरीत भजीं व दहीं-वडे ( जरी आवडत असले तरी ) खाण्याला-अपथ्याचें-असल्यानें-बरें वाटत नाहीं; त्याचप्रमाणें स्वदेशी वस्तु खरेदी न केल्याच्यायोगानें देशी दुकानें व कारखाने बंद पडतात. त्यायोगानें आपले देशांत दारिद्य, बेकारी व परतंत्रता वाढत असलेली ज्यास कळते

त्याला तुमच्याप्रमाणें वागणें अपथ्याचें वाटतें. सुख हें मानण्यावर आहे अह्मांस यांतच सुख वाटतें. अशा परिस्थितीचा ज्याला रोग झाला आहे त्या तुह्मी विदेशी जिनसारूपी भजी-वडे खाऊन तुमच्या स्वदेशरूपी शरीराची प्रकृति बिघडल्याशिवाय राहील काय? तुह्मी असें ह्मणा कीं— तुमचें पथ्य खरें आहे. मग उद्यां काय वाटेल तें असल्या शरीराचें होवो, आह्मी अपथ्य करून रुचकर लागणारीं भजीं-व दहींवडे खाणार, असें ह्मणालच तर नाइलाज आहे. असो.

आकरावें ध्येयः—शारिरीक शिक्षणाची संस्था उघडणें व आरोग्यतेची तत्वें समजाविणें—विजयपुरींतील ब्राह्मण मंडळींनीं एका मल्लविद्याविशारदाच्या देखरेखीखालीं मुलां-करितां व्यायाम-क्षिक्षणाची संस्था काढली आहे. तेथें कसरत कुस्ती, दांडपट्टा, लेझिम वगैरेचें शिक्षण दिलें जातें. ह्या संस्थेंत पोहण्यासही शिकवितात. पुष्कळ मोठीं माणसें व मुलें ह्या संस्थेंचा लाभ घेत असतात. वस्तीच्या मानानें या संस्थेच्या ३।४ शाखा उघडण्यांत आल्या आहेत. रोजची नमस्काराची संवय असल्यानें मुलाचीं शरिरें आधींच पिळदार

असतात. त्यांत ह्या संस्थेंतून शिक्षण घेतल्यानंतर त्यांचीं शरीरें पुढें चांगलींच सुदृढ बनलीं असल्यानें प्रसंगीं आपलें व दुसऱ्याचें संरक्षण करण्यास तीं लायक झालीं आहेत.

सर्व साधारण स्वच्छता आणि आरोग्य ह्या विषयाचें एक लहानसें पुस्तक लिहून तें मोफत वाटण्यांत आलें आहे. जें समजलें व पटलें त्याची अंमलबजावणी तावडतोब करून, तशी बहुतेकांनीं आपली सुधारणा करून घेतली आहे; त्यामुळें त्यांस वैद्याचें घर पाहण्याचा प्रसंग फारसा येत नाहीं.

बारावें ध्येयः—गरीब ब्राह्मणविद्यार्थ्यांस मदत करणें व संकटसमयीं गरीबांस साह्य करणें—खरोखर परिस्थितीचा विचार करून, पोटजातीभेद लक्ष्यांत न घेतां कोणत्याही गरीब ब्राह्मणविद्यार्थ्यास फी व पुस्तकांकरितां सभेनें द्रव्य-साह्य करण्याची योजना केली आहे, त्या प्रमाणें वार लावून जेवणारीं किंवा मधुकरी मागणारीं बरींच गरीब मुलें ह्या संस्थेचा लाभ घेतात.

गरीबांच्या सोयीकरितां प्रत्येक भाग ५ रु. चा, अशी एक पेढी काढली आहे. पुष्कळ गरीब लोक ह्या पेढीचे भागीदार झाले आहेत. भागीदारास जामीन देऊन त्यांतून कर्ज मिळतें; ह्या पेढीमुळें गरीबांची चांगली सोय झाली आहे. शिवाय, गरीबाच्या सोयीकरतां सभेच्या धर्मादाय फंडांत चार अनाथ-प्रेतसंस्काराला पुरेल इतकी रकम नेहमीं शिल्लक असते.

ब्राह्मणांच्या सार्वजनिक कार्याकरितां मध्यवस्तींत पण चांगल्या हवेशीर जागीं 'ब्राह्मण-भुवन' या नांवाची इमारत बांधली जात आहे. थोड्या दिवसांनीं तिचें बांधकाम पुरें होईल. या इमारतींत सार्वजनिक व्याख्यानें, प्रवचनें, कीर्तनें वगैरे होतील. लग्न-मुंजीसारखीं मंगलकार्यें होऊं शकतील. त्या संबंधीं पाट, भांडी, बिछाईत वगैरे सामाना बद्दल भाडें दिलें असतां सर्व कांहीं तेथें मिळूं शकेल, अशी व्यवस्था केली आहे.

तेरावें ध्येयः—कीर्तनें, प्रवचनें व व्याख्यानें ह्या साधनांनीं ब्राह्मणसमाज सुशिक्षित करून सुधारणा करणें व विद्वानांचा सन्मान करणें:—ह्यावरील कमेटीनें विद्वानांचा

सन्मान करून निरनिराळ्या विषयांवर प्रवचनें, व्याख्यानें कीर्तनें, करविण्याची तजवीज केल्यामुळें समाजांत पुष्कळ सुधारणा झालेली पहाण्यांत येत आहे, शारिरिक, व्यावहारीक धार्मीक, सामाजिक, राजकीय व पारमार्थिक प्रवचनें वारंवार ऐकत गेल्यानें मंडळींचीं मतें खालीं दर्शविल्याप्रमाणें बनचीं आहेत, व त्याप्रमाणें तेथील ब्राह्मण वागत आहेत.

(अ) शारिरिक-शरीर हें सर्व पुरुषार्थाचें मूळ आहे. तें प्रत्येकानें कमावलें पाहिजे. आहार, विहार, निद्रा वगैरे सर्व नियमित पाहिजे. रोग झाला असतां त्याची हयगय न करितां पथ्यानें वागून होईल तितका औषधाशिवाय तो दूर करावा. सर्व घर-कामें स्त्रियांनीं जातीनें करावीं. शरीर अन्न, पाणी, कपडे, घर व घराभोंवतालची जागा हीं सर्व अत्यंत स्वच्छ ठेवावीं.

(आ) व्यावहारिक-व्यवहारांत भलत्याच रुढी शिरल्या आहेत त्या बंद कराव्या, आदरातिथ्यांत, रोजच्या व्यवहारांत आणि लग्नकार्यादि प्रसंगांत चहाचें बंड माजलें आहे तें मोडून चहाचे बद्दल चिवडा, पोहे, लाडू, दशम्या, कडबोळीं

वगैरेचा उपयोग करावा. न्हाणवलीला बसविण्याची, वाढणें आणण्याची, मिरविण्याची, बायका जेवूं घालण्याची व गर्भाधानाचें दिवशीं रात्रीच्या जेवणावळीची चाल बंद करावी. घोड नवरा-नवरीकडून विड्या तोडणें, सुपाऱ्या खेळणें, गुळण्या टाकणें बंद करावें. तसेंच खरे डोहळे न पुरवितां नानाप्रकारचीं डोहाळजेवणें करण्याचें बंद करावें. लग्न-मुंज गर्भाधान संस्कारांतील धार्मिक विधींत कांहींएक कसुर न करतां मुख्य मंत्राचा अर्थ समजेल असा सांगावा. लग्न-मुंजी वगैरे कार्यांत बँड बोलवूं नये. व्यवहारांत भलत्या गोष्टीची भीड-शरम बाळगूं नये. म्हणजे आग्रहानें जेवूं नये, कोणासही पैसे दागिने किंवा कांहीं किमती वस्तु दिल्या-घेतल्याचा व्यवहार केल्यास पावती घ्यावी-द्यावी. घराची भाडेचिठी करुन घ्यावी. निरुद्योगी, कुचर, लबाड व केवळ ऐतोजी पाहुण्याचे शरमेंत न पडतां त्याची कानउघाडणी करुन त्यास उद्योगास लावावें. जशास तसें वागण्यांत दोष मानूं नये. कोणत्याही व्यवहारांत न फसतां ईश्वराचे अधिष्ठानासह दीर्घसुचनेनें व्यवस्थित संसार करावा.

(इ) धार्मिक—ब्राह्मण ह्मणविण्याऱ्यांनीं आपले आश्रम धर्माप्रमाणें वागून कर्म केलें पाहिजे. भस्म व गंध लावण्यास लाजूं नये. (पान १४ वरील मजकूर पहा) कित्येक प्रतिपादन करतात कीं, पूर्वी वेदकालीं मूर्ति-पूजा व आतांच्या इतक्या कर्मांच्या कटकटी नव्हत्या. पुराणकालीं हें सर्व बंड उपस्थित झालें आहे. असेल, पण वेदकालीं बहुतेक लोक जितेंद्रिय कर्तव्यनिष्ठ, ईश्वरभक्तिपरायण, योग-ध्यानधारणा कारणारे होते. अशांचा धर्म निराळा असणें सहाजिकच होतें. पण आतांचा ह्मणजे कनक-कांतेचे दास बनलेल्यांचा-विषयांत लोळत पडणाऱ्या बहिर्मुखांचा धर्म तोच कसा असूं शकेल? कैदी जितका पळपुट्या व तुफानी तितकी त्यास बंधनें हीं फार असावयाचीं.

(उ) सामाजिक—मी, माझें कुटुंब व माझें घर इतकेंच न बघतां, समाजाचें हित तें माझें हित अशा समजुतीनें प्रत्येकानें समाज-सेवा करावी. पोट जातींत लग्नें करावीं. जरठ, कुमारीविवाह होऊं देऊं नये. हुंडा न मागणें, वर-पक्षानें भलतेच मानपान मागत न बसणें व त्यांसाठीं न रुसणें, कन्याविक्रय न करणें वगैरे वाईट चाली मोडून टाकाव्या.

नव्याला जुनें हंसतच येत आहे; तरीपण पोशाकाचें बाबतींत स्त्रियांनीं जसें लुगडें व चोळी कायम ठेवली आहे तसेंच पुरुषांनींही आपला पोशाक विदेशीयाप्रमाणें न करणें चांगलें. मुलालाही साहेबी पोशाक करूं नये. स्त्रियांनीं अविवाहित राहूं नये. पुरुषीपेशानें वागूं नये. मुलगी उपवर झाली कीं विवाह करावा, कायद्याची अडचण असल्यास आधीं वाङ्निश्चय करून मुलीला सासर-माहेर करावें व योग्य वयाला विवाह करावा. स्त्रिया-पुरुष ह्यांनीं अशिक्षित राहूं नये. तार, टपाल रेल्वे व सामान्य कायदे ह्यांची माहिति स्त्रियांनासुद्धां अवश्य असावी. तसेंच स्त्रियांचे आंगीं धैर्य प्रसंगावधान व आत्म संरक्षण करण्याचें चातुर्य असलें पाहिजे. प्रसंगीं स्त्रियांना एकट्यानें प्रवास करतां आला पाहिजे. ह्मणून त्यास बावळटपणा व फाजील भीड-शरम असतां कामा नये.

संसार-रथाचीं स्त्री-पुरुष हीं दोन चाकें आहेत. प्रपंचांत स्त्रीपुरुषाचा दर्जा सारखाच आहे. ह्यास्तव स्त्रीपुरुषांनीं धर्मकर्मभ्रष्ट न होतां स्वतःची व समाजाची सर्व बाजूंनीं सुधारणा होऊन ईश्वराचे अधिष्ठान पूर्वक सुखाचा संसार करतां येईल असे नित्यशःप्रयत्न सुरु ठेवले पाहिजेत.

(ए) राजकीय-नऐकणाऱ्या जवळ हक्क सांगत बसण्यापेक्षां सर्व ब्रह्मांडनायक-अधिकाऱ्यांचा अधिकारी महाराजांचा महाराजा जो जगदीश त्यावर श्रद्धा ठेवून त्याला आपण शुद्धवर्तनानें व स्वधर्मानें वागून आळवावें आणि व्यवहारांत तदुद्योग करीत रहावें म्हणजे ईश्वराचें साह्य मिळतें. राजकारणांतच काय पण एरवीं सुद्धां दरेकास शरीरबल, शिस्त, ऐक्य, धाडस, प्रामाणिकपणा व सर्व बाजूचें ज्ञान हीं अवश्य असावयास पाहिजेत. मात्र त्याचा दुरुपयोग करूं नये. प्रत्येकानें स्वदेशी वस्तु वापरावी. व्यापाऱ्यांनीं प्रामाणिकपणानें चालावें, आणि आपल्या भांडण-तंट्याचे निकाल लवाद नेमून करावे.

राजकीय बाबतींशीं स्पृश्यास्पृश्याचा फारसा संबंध नाहीं, तरीपण आपल्या हिंदुधर्माच्या अज्ञानामुळें शूद्र-अतिशूद्र वर्णाचे लोक धर्मांतर करतात ही गोष्ट फार वाईट आहे. आपल्या कर्तव्यानें वागणारा खरा-अस्पृश्य मला स्पृश्य समजा असा कधींही आग्रह धरीत नाहीं. आणि त्याच प्रमाणें खरा सनातन धर्माचा मनुष्य स्पृश्यास्पृश्याचे बाबतींत शास्त्रानें घालून दिलेल्या मर्यादेचा देश-काल-परिस्थितीनें विचार करून फाजिल विटाळाचे बंडही माजवीत नाहीं व

त्यांचे हातांत हात घालून बळेंच सबगोलंकार करण्याचें मनांतही आणीत नाहीं. अस्पृश्यांस अगदीं समतेनें वागविण्यापेक्षां त्यांच्याशीं पूर्ण ममतेनें वागणें अधिक चांगलें.

( ओ ) पारमार्थिक--ह्या विषयावरील कीर्तनें, प्रवचनें, ऐकून तेथील ब्राह्मणांचीं अशीं मतें बनलीं आहेत—हिंदुस्थान हा देश पृथ्वीरूपीं राजवाड्यांतील देवघर आहे. हें धर्मक्षेत्र आहे. हीं पुण्यभूमि आहे. मोक्ष संपादक कर्मभूमि आहे. जर्मनी, फ्रान्स अमेरिकादि देशाप्रमाणें केवळ भौतिक सुखाच्या मागें लागण्याकरितां हिंदुस्थान नाहीं, हा देश अमृतत्व मिळविण्याचें स्थान आहे. पंचभूतांवर व कालावर सत्ता चालवितां येण्याचें स्थान आहे. त्याला अनुकुल वर्णाश्रमधर्माची योजना आहे. ह्या मार्गानें ह्या देशांत हजारो मानवांनीं शाश्वत-सुखानें साम्राज्य मिळविलें आहे. तें मिळवणें हें आपलें अंतिम साध्य आहे. नेटक्या प्रपंचांत नीती-न्यायानें व आश्रमधर्माप्रमाणें वागतां-वागतां चित्तशुद्धि होत जाते. उत्तम रीतीनें वागूनहीं प्रारब्धयोगानें प्रपंचांत अनेक संकटें, त्रिविधतापाचीं दुःखें, भीति व जरा

ह्यांच्याशीं शेवटीं गांठ पडतेच. मग कुठें जरा वैराग्य (एखा-द्यासच) उत्पन्न होतें. सुखाची वस्तु कांहीं निराळी असली पाहिजे असें त्यास वाटूं लागतें, नेटक्या पपंचातही ती नाहीं. ह्मणूनच श्रीसमर्थ ह्मणतात ॥ मूर्खामाजी परम मूर्ख । तो संसारीं मानीं सुख ॥ या संसार-दुःखा एवढें दुःख । आणीक नाहीं ॥ साधुसंताला स्वानुभवानें जें खरें दिसलें तें त्यांनीं सांगितलें. पण कित्येक विद्वानमंडळींनीं, श्री आदिशंकराचार्यां पासून तों श्री ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व त्यांचे खरे वारकरी ह्या सर्वांनीं आपल्या मायावादाच्या व वैराग्याच्या उपदेशानें हा आमचा हिंदुस्थान आळशी, कर्तृत्वशून्य, कंगाल व नामर्द बनवला आहे. असा आक्षेप सर्व साधूंची निंदा करून त्यांजवर ठेवला आहे, तो साफ खोटा आहे, ह्यांत श्री समर्थाला वगळलें आहे. वास्तविक त्यांनीं लोक परमार्थ तर ऐकत नाहींतच पण त्यांस प्रपंचही नीट करतां येत नाहीं. अशा स्थितींत ॥ आधीं प्रपंच करावा नेटका ॥ असें सांगितलें. प्रसंगोपात व्यवहार व राजकारण सांगितलें आहे. पण वास्तविक समर्थही महाविरक्त असून मायावादीच होते. त्यांचे बाराआणे काव्य अध्यात्मपर आहे.

अरे जें झालेंचि नाहीं । त्याची वार्ता पुससी कांई ।। ' महा घोर हा थोर संसार मोठा ' वगैरे हें कशाचें द्योतक आहे ? ज्या साधु-संताच्या हाकेला जगन्नियंत्यानें ओ देऊन आपल्या अचलपदावर बसविलें, ते साधुसंत लोकांना अकल्याणकारक असें भलतेंच कसें सांगतील ? ज्या अग्निनें सैंपाक होतो व शीत निवारण होतें त्या अग्निचा घरें जाळण्याकडे जर उप-योग केला तर त्याचा अग्निकडे काय दोष? साधुसंतांनीं आपला स्वानुभव सांगितला व अधिकार तैसा उपदेश केला भलत्यानें भलत्याचा धर्म घेऊन किंवा उपदेशाचें अर्धवट आचरण करण्यापासून देशाला आपत्ति उत्पन्न झाली आहे, त्याचा दोष, लोकाकडेच आहे, ' नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी ' इतकें लोकांनीं ध्यानांत ठेवलें पण ' हरेराम हा मंत्र सोपा जपारे ' हें मात्र लोक विसरले. तसेंच ' पोटा शेर अन्ना चाड । एर वावगी बडबड । हें ध्यानांत राहिलें पण ; तुका ह्मणे श्रम । एक विसरतां राम ।। इकडे अगदींच दुर्लक्ष्य झालें. ह्या उपदेशांत श्री समर्थांचा किंवा तुकारामांचा काय दोष होता ? विशेषतः उपदेशाचें अर्धवट वर्तन किंवा

गृहस्थानें सन्याशाचें आचरण केलें तर त्याचें अनिष्ठ फल मिळा-ल्याशिवाय राहणार नाहीं. खोटया निवृत्तिपेक्षा प्रवृत्ति चागली.

विजयपुरींतील ब्राह्मणमंडळी श्रद्धावान व भाविक आहे. नित्य कीर्तन, पुराण सुरू असतें. रात्रीं किंवा फावल्या वेळीं श्रीमत् आचार्यांचे ग्रंथ, साधुसंतांचे प्राकृत ग्रंथ व गाथा वरीच मंडळी वाचत असतात. पण खऱ्या परमार्थाकडे वळलेले त्यांत काचितच आहेत. वास्तविकच आहे. ॥ मनुष्याणाम् सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । श्री समर्थ म्हणतात ॥ जो संसार दुःखें दुखवला । त्रिविधतापें पोळला । तोचि अधिकारी झाला । परमार्थासी ।

चौदावें ध्येयः--गुरुकुलासारखी लहानशी संस्था काढणें:--सर्व जगांत वेद हे जुने ग्रंथ आहेत. ते आजपर्यंत ब्राह्मणांनींच टिकविले आहेत. वेद राहतील तोंपर्यंत हिंदुधर्म जगेल. पाश्चात्य पंडितांनींही वेदाची व वेद टिकविणाऱ्या ब्राह्मणांची स्तुति-स्तोत्रें गाइलीं आहेत. हें तत्त्व जाणून विजयपुरींतील ब्राह्मणमंडळी वेदाची व वैदिकाची कधींही टवाळी करीत नाहींत, त्यांजकडे ते कधींही तिरस्कारबुद्धीनें पहात

नाहींत. त्यांची अशी पक्की खात्री झाली आहे कीं, वैदि-कांना उत्तेजन दिलें तरच वेद जिवंत राहतील. म्हणून वैदि-कांचा योगक्षेम चालून समाजांत त्यांचा मान राहील, इकडे ते लक्ष्य पुरवितात. उत्सवाच्या विविध कार्यक्रमांत मंत्रजागरण ही बाब अवश्य ठेवतात. वेद टिकावे म्हणून तेथील ब्राह्मण-मंडळीपैकीं निरनिराळ्या वेदाच्या अध्यापकांनीं—गुरुजींनीं जवळ जवळ ६० विद्यार्थ्यांस वेदाचें शिक्षण देण्याचें आपले घरीं सुरू केलें आहे. विद्यार्थ्यांना गुरुजींचें सांगणें असें आहे कीं, हल्लींच्या काळांत केवळ वेद विद्येवर उपजीविका चालणें कठीण आहे, तरी प्रत्येक विद्यार्थ्यानें वेदपठणाशिवाय एखाद् दुसरी कला अवश्य संपादन करावी. त्याप्रमाणें बहुतेक सर्व विद्यार्थ्यांनीं गणपती करणें, आसनें, जानवीं तयार करणें, सुगंधी सामान उदबत्त्या वगैरे तयार करणें, मेणाचीं चित्रें करणें, औषधें करणें, बारीक सूत काढणें इत्यादी पैकीं एक-दोन कला हस्तगत केल्या आहेत. इकडे तोंडानें आवृत्ति चालते व इकडे कामही करितां येतें. सर्व विद्यार्थ्यांस सामान्य शिक्षण व बाल-चर-स्काउटचें शिक्षण प्रारंभींच मिळालेलें असतें. विद्यार्थ्यांचे दशग्रंथ होण्यास

अजून २।३ वर्षे पाहिजेत. सर्व विद्यार्थी जेवणापुरते घरीं जातात बाकी सर्व काल गुरु-गृहीं जातो. सर्व अध्यापक चांगले जाडे विद्वान असल्यानें त्यांचा योगक्षेम चांगला चालतो. शिवाय ब्राह्मणसभेकडुनही कांहीं पारितोषक त्यांस दिलें जातें. असो.

तात्पर्य, विजयपुरी येथील ब्राह्मणांनीं आपली उत्तम प्रकारची सुधारणा करून घेतली आहे. तेथील ब्राह्मणांनीं मुख्य धोरण असें ठेवलें आहे कीं,--कोणताही व्यवसाय असो, कोणतीही परिस्थिति असो, ब्राह्मणांनीं हिंदुसंस्कृति कायम ठेवावयाची, कालमानाप्रमाणें ब्राह्मणधर्म कायम ठेवावयाचा व अध्यात्मिक ज्ञान कायम ठेवावयाचें. पहिल्या नंबरची स्वच्छता व शिस्त पाळावयाची, स्वदेशी वस्तु वापरावयाच्या, बोलण्या चालण्यांत मेळ ठेवावयाचा, ज्ञानार्जन करून उद्योगी व्हावयाचें, ऐक्य वाढवावयाचें व सरळ वर्तन ठेवून जेणेंकरून जनता सुखी होईल ते प्रयत्न करावयाचें. याप्रमाणें वागण्यास सर्व ब्राह्मणांना सुबुद्धि द्यावी अशी जगन्नियंत्याजवळ प्रार्थना आहे.

---

ॐ तत्सत्.

मराठी ग्रंथ संग्रहालय

REFBK-0003833